**नि.फौ.ख.क्र. ६४८/२०२२.**
**सरकार वि. इस्ताक.**
**<u>नि.क्र.२९.</u>**

**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ०१ यांचा पुरावा**
मी प्रतिज्ञेवर कथन करतो ते येणेप्रमाणे
**माझे नांव - उत्तम नंदकुमार लोणकर,**
वय- ३६ वर्षे, व्यवसाय:- खाजगी नोकरी,
रा. किवळे, पुणे.

**<u>सरतपास सरकारतर्फे सहा. सरकारी वकील श्रीमती विरकुड यांच्यामार्फत:-</u>**

०१. मी किवळे येथील कायमचा रहिवाशी असून इंद्रा पार्क आदर्श नगर बी विंग ४०६ मध्ये माझा फ्लॅट आहे.दि. २०.०६.२०२१ रोजी मी माझे कामानिमित्त सकाळी १०.०० वा. वाकड येथे गेलो होतो. त्यानंतर दुपारी ५.०० वा. माझे फ्लॅटमध्ये आलो असता अज्ञात इसमाने माझ्या घराचे मुख्य दरवाजा कुलूप तोडून घरामधील किचनमधील व बेडरुममधील कपाट उघडून घरातील सोन्या चांदीचे दागिने चोरी केल्याचे मला दिसून आले. त्यावेळी मी पाहणी केली असता माझ्या घरातील सोन्या चांदीचे दागिणे ज्यामध्ये राणी हार, गंठण, कानातले झुबे, चांदीचा कंबर बेल्ट, पैंजण, छल्ला असे अंदाजे १,६५,५०० किंमतीचा मुद्देमाल चोरी झाल्याचे मला निष्पन्न झाले त्यामुळे मी पोलीस स्टेशन देहूरोड येथे घटनेची फिर्याद नोंदवली. आता मला फिर्याद दाखवण्यात आली. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास नि क्र. २९ देण्यात येते. मला मुद्देमाल परत मिळालेला आहे. मी आरोपीस ओळखत नाही. त्यानंतर मी पोलीसांना पंचनामा करताना घटनास्थळ दाखवले होते.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>फिर्यादीचा उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ तनवीर जहागिरदार यांच्यातर्फे शपथेवर सुरु.</u>**

०२. मी सदर फ्लॅट २०१८ साली खरेदी केला आहे. मी राहत असलेला

फ्लॅटची इमारत सहा मजली होती. माझा फ्लॅट चौथ्या माळयावर होता. प्रत्येक माळयावर सहा फ्लॅट आहेत. माझा विवाह मे सन २०१५ साली झाला. माझ्या फिर्यादमध्ये गंठण शब्द नमूद नाही. मला मिळालेला हार दोन तोळयाचा आहे. माझ्या फिर्यादमध्ये तीन तोळयाचा हार चोरीस गेल्याचे नमूद असून दोन तोळयाचा हार चोरीस गेल्याचे नमूद नाही. पंचनाम्याकरीता पोलीस हे २० तारखेस ५.०० वाजता नंतर आले होते. त्यावेळी फक्त पोलीस आले होते. हे म्हणणे खरे आहे की, सन २०२१ साली तथाकथीत घटनेच्या वेळी आमच्या अपार्टमेंटसमोर दहा मजली इमारतीचे बांधकाम सुरु होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे तेथे सुरक्षा रक्षकाची नेमणूक करण्यात आली होती. आमच्या इमारतीस दिवसा एक व रात्री एक सुरक्षा रक्षक नेमणुकीस आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात नमूद चोरीची घटना घडली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी पत्नी तथाकथीत घ टनेच्या वेळी बिल्डरकडे खाजगी नोकरीस होती. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांच्या सांगण्यावरुन फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझा मुद्देमाल नसतांना मी न्यायालयाची दिशाभूल करुन मुद्देमाल मिळवला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा प्रकरणाशी संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

दि. २७/११/२०२५.

**श्रवणोत्तर स्विकृत,**

**साक्षीदारास वाचून दाखविले व बरोबर असल्याचे मान्य केले.**

ABHAY MALLIKARJUN VIBHUTE
Digitally signed by ABHAY MALLIKARJUN VIBHUTE
Date: 2025.11.27 13:50:58 +0530

**(अभय म. विभुते)**
सह. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
वडगांव मावळ, पुणे.

**(अभय म. विभुते)**
सह. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
वडगांव मावळ, पुणे.